**पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणारी द्रावणे/ उपकरणे यांचे प्रमाणीकरण करण्यासाठी तांत्रिक सल्लागार समितीची स्थापन**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. डब्ल्यूक्यूएम २००१/प्र.क्र. २२४/पापु.१२**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १९.९.२००१**

**प्रस्तावना-**

राज्यातील ग्रामीण व नागरी भागात शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा करण्याचे शासनाचे धोरण असून पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण हा अतिशय महत्त्वाचा, जिव्हाळयाचा व मनुष्य जिविताशी संबंधित विषय आहे. त्यामुळे पाणी शुध्दीकरणासाठी बाजारात उपलब्ध इतर द्रावणे उपकरणे यांचा वापर जिल्हापरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ग्रामपंचायत व ईतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी करण्यावर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल पावडर व्यतिरिक्त इतर अनेक प्रकारची द्रावणे व उपकरणे उपलब्ध असून नगरपरिषदा, महानगरपालिका, जिल्हापरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामपंचायत स्तरावर या द्रावणाचा/ उपकरणांचा मोठया प्रमाणावर उपयोग करण्यात येतो. अशी द्रावणे/ उपकरणे शास्त्रीयदृष्टया व आर्थिकदृष्टया सुयोग्य आहेत किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील पाणी पुरवठा योजनांव्दारे पुरवठा होणा-या पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी सध्या स्थानिक स्वराज्य संस्था विविध द्रावणे/ उपकरणे यांचा वापर करित आहे. तथापि या द्रावण/ उपकरणांची शास्त्रीय व आर्थिक दृष्टीकोनातून परिक्षण झालेले नसते. त्यामुळे या द्रावणांच्या / उपकरणांच्या वापरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समानता राहत नसल्यामुळे आवश्यक तो परिणाम साधता येत नाही. यास्तव स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वापरण्यात येणारी सर्व प्रकारची द्रावणे/ उपकरणे



834

यांचे शास्त्रीय व आर्थिक परीक्षण करुन त्यांची उपयुक्तता निश्चित करण्यासाठी शासनस्तरावर पुढील प्रमाणे तांत्रिक सल्लागार समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय , मुंबई | अध्यक्ष |
| २) | संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनायल, मुंबई. | सदस्य |
| ३) | महासंचालक, आरोग्य महासंचालनालय, मुंबई | सदस्य |
| ४) | संचालक, औषधे व अन्न प्रशासने, मुंबई. | सदस्य |
| ५) | सदस्य सचिव (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| ६) | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे. | सदस्य |
| ७) | संचालक , (पीपीएमयू), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई. | सदस्य |
| ८) | कक्ष अधिकारी, का.क्र.पा.पु.१२, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई. | सदस्य सचिव |

**२. समितीची कार्यकक्षा-**

या तांत्रिक सल्लागार समितीची कार्यकक्षा व त्याची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहील.

१) ब्लिचिंग पावडर वगळता पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणारी सर्व द्रावणे/ उपकरणे व त्यासंबंधीचे विकसित तंत्रज्ञान यांची आर्थिक व शास्त्रीय दृष्टीकरणातून परिक्षण करुन उपयुक्तता निश्चित करणे.

२) उपरोक्त द्रावणे उपकरणे व त्यासंबंधीचे विकसित तंत्रज्ञान यांची गुणवत्ता व उपयुक्तता यांच्या निकषावर निवड करुन राज्यस्तरावरील उत्पादक पुरवठादार यांचे पॅनल तयार करणे

३) या पॅनलमध्ये समाविष्ट असलेल्या उत्पादक व पुरवठादार यांच्याकडूनच पाणी शुध्दीकरणासाठी वापरावयाची द्रावणे/उपकरणे व त्यासबंधीचे विकसित तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी **राज्यातील ग्रामपंचायती/ जिल्हापरिषद/ नगरपरिषदा/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांना शिफारस करणे.**

४) वर्तमानपत्रातून व इतर माध्यमांतून जाहिरात देवून ग्रामपंचायती/ जिल्हापरिषद/ नगरपरिषदा/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आपली उत्पादन पुरवू इच्छिणा-या उत्पादकांकडून आवश्यकता भासल्यास अर्ज मागविणे.



३८३६

५) द्रावणे/ उपकरणे यांची तांत्रिक दृष्टीकोनातून छाननी करण्यासाठी समितीला आवश्यक वाटल्यास निरी (नागपूर), नॅशनल केमिकल लॅबोरेटरिज (पुणे), सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड (नागपूर), हाफकीन ईनिस्टटयूट (मुंबई) व अशा इतर शासकीय / निमशासकीय संस्थांकडे सदर उत्पादने/ उपकरणे पाठवून त्यांचे तांत्रिक बाबतीत अभिप्राय घेणे. तसेच अशा मान्यता प्राप्त संस्थांच्या प्रतिनिधींना समितीच्या सभेत आमंत्रित करुन चर्चा करणे.

६) पॅनेलमध्ये उत्पादनांची नावे अंतर्भूत करण्यासाठी निकष निश्चित करणे.

३. **राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी शुध्दीकरणासाठी एखाद्या द्रावणाचा/ उपकरणाचा वापर करावयाचा असल्यास त्याची उपयुक्तता निश्चित करुन घेण्यासाठी संबंधित द्रावणांची / उपकरणांची माहीती अथवा शिफारस या संस्थांनी समितीकडे पाठवावी व समितीने त्यांचा अंतर्भाव पॅनलमध्ये केल्यानंतरच द्रावणांचा/ उपकरणांचा वापर करावा.**

४. पॅनलमध्ये अंतर्भाव करण्यात आलेली द्रावणे/ उपकरणे यांच्या उत्पादक किंवा पुरवठादारांसोबतच जिल्हा परिषदांनी स्वतंत्ररित्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावी.

५. पॅनलमध्ये समाविष्ट करावयाची द्रावणे/ उपकरणे यांच्या उत्पादनाबाबतची क्षेत्रिय प्रात्यक्षिके आवश्यक असल्याचे समितीचे मत झाल्यास, सदर प्रात्यक्षिके उत्पादक अथवा पुरवठादारांनी त्यांच्या स्वखर्चाने दाखवावीत व त्याचा क्षेत्रिय अहवाल समितीस सादर करावा.

६. ब्लिचिंग पावडर व्यतिक्ति पाणी शुध्दीकरणासाठी वापरावयाच्या सर्व द्रावणे/ उपकरणे यांच्या खरेदीसाठी कोणतेही शासकीय अनुदान अनुज्ञेय असणार नाही. यासाठी आवश्यक ती तरतूद संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी देखभाल व दुरुस्ती निधीमधून करावी. अथवा योजनेच्या अंदाजपत्रके व आराखडयातच यासाठी तरतूद करण्यात यावी.

७. उपरोक्त पध्दतीने निश्चित केलेल्या पॅनलवरील उत्पादक किंवा पुरवठादाराच्या द्रावण/ उपकरणाच्या उपयुक्ततेबाबत अथवा कार्यक्षमतेबाबत संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकारण/ जिल्हा परिषद/



8336

ग्रामपंचायत/ नगरपरिषद यांच्याकडून तक्रार प्राप्त झाल्यास सदर उत्पादनाचे नाव पॅनलवरुन कमी करण्याचे अधिकार तांत्रिक सल्लागार समितीस राहतील.

८. तांत्रिक सल्लागार समितीने दिलेला निर्णय संबंधित उत्पादन/ पुरवठादार यांच्यावर बंधनकारक असेल. तथापि आवश्यकतेनुसार या निर्णयावर फेरविचार करुन अंतिम निर्णय देण्याचे अधिकार शासनास राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३) सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहाय्यक
४) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
५) महासंचालक, आरोग्य महासंचालनालय, मुंबई.
६) संचालक, औषधे व अन्न प्रशासने, मुंबई.
७) सदस्य सचिव (तांत्रिक ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८) जिल्हाधिकारी (सर्व)
९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१०) संचालक, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) जिल्हा आरोगय अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१४) मुख्याधिकारी नगरपरिषद (सर्व)



४३८